महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004
EPABX: 0253- 2539100/300, Fax: 0253 - 2531836, Ph.: 2539214
Email: coe@muhs.ac.in, preexam@muhs.ac.in Website: www.muhs.ac.in

MUHS

डॉ. अजित गजानन पाठक
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),
परीक्षा नियंत्रक

Dr. Ajit Gajanan Pathak
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
Controller of Examinations

जा.क्र. मआविवि/एक्सपी/२९८४/२०२० महत्वाचे/तात्काळ दि. ०५/०६/२०२०

कार्यालयीन परिपत्रक

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्था,
मआविवि, नाशिक

विषय : विद्यापीठ उन्हाळी-२०२० लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेबाबत...

संदर्भ : शासनाच्या धोरणास अनुसरुन व वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाच्या अधीन राहून

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन मला प्राप्त आदेशान्वये आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ उन्हाळी-२०२० लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा जुलै/ऑगस्ट मध्ये सद्यस्थितीत विद्यार्थी ज्या महाविद्यालयात प्रवेशित आहे त्या महाविद्यालयात घेण्याचे प्रस्तावित आहे. उपरोक्त लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या स्थानिक गावातील अथवा नजीकच्या पसंतीच्या परीक्षा केंद्रावर परीक्षेस केंद्र बदली हवी असल्यास व त्या ठिकाणी त्यांच्या अभ्यासक्रमाचे परीक्षाकेंद्र उपलब्ध असल्यास, त्यांना परीक्षा केंद्र देण्यात येईल.

तथापि सदर विद्यार्थ्यांचे पालकांचे निवासी शहर हे त्यांनी मागितलेल्या पर्यायांपैकी असल्याचे प्रमाणित करण्यासाठीचे दस्तावेज विद्यार्थ्यांकडून घेऊन आपण (विद्यार्थी ज्या महाविद्यालयात शिकत आहे त्या महाविद्यालयाच्या प्राचार्य/अधिष्ठाता यांनी) प्रमाणित करावे.

करीता सोबत जोडलेला विनंती अर्ज नमुना भरुन महाविद्यालय अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक यांनी प्रमाणित आणि स्वाक्षांकित केलेले अर्ज व सदर विद्यार्थ्यांची यादी (नमूना संलग्न), महाविद्यालयामार्फत दि. १२ जून, २०२० पर्यंत दुपारी ०२:०० वाजेपर्यंत विद्यापीठास संबंधित विद्याशाखेच्या ई-मेल पत्त्यावर सादर करावी. सदर परिपत्रकानुसार विद्यार्थी हे ज्या लेखी परीक्षा केंद्राची निवड करतील, त्याच परीक्षा केंद्रावर त्याला प्रात्यक्षिक परीक्षेस उपस्थित रहावे लागेल. तसेच विद्यार्थ्याने दिलेल्या पर्यायांपैकी परीक्षा केंद्र न मिळाल्यास स्वतःच्याच महाविद्यालयात परीक्षाकेंद्र असेल.

कृपया विद्यार्थ्यांना सदरील कोव्हिड-१९ च्या कामकाजासाठी टाळेबंद परिस्थितीमध्ये महाविद्यालयात बोलावू नये. दूरध्वनीद्वारे व ई-मेलद्वारे त्यांच्याशी संपर्क साधून महाविद्यालयांनी माहिती गोळा करावी.

सही/-
(डॉ. अ.ग. पाठक)
परीक्षा नियंत्रक

सोबत : १) विद्यार्थ्यांनी करावयाच्या अर्जाचा नमूना
२) महाविद्यालयाने विद्यापीठास सादर करावयाच्या यादीचा नमूना
३) विद्यापीठ उन्हाळी-२०२० लेखी परीक्षाकेंद्रांची यादी

प्रत माहितीस्तव : (१) (i) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
(ii) मा. प्रति-कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
(२) विद्यार्थी सहाय्य केंद्र, मआविवि, नाशिक

Terna Public Charitable Trust's
Terna Medical College
Nerul, Navi Mumbai 400706
Inward No. 1011
Date 08/06/2020
Signature of Receiver

- Forward to HOD's
+ Forward to all Exam going Students
by whatsapp / Email etc.
- Mr. Sagar to put application form on website

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक

प्रति,
मा. परीक्षा नियंत्रक
मआविवि, नाशिक

विषय : विद्यापीठ उन्हाळी-२०२० लेखी परीक्षेस स्थानिक गावानजीकचे परीक्षाकेंद्र मिळणेबाबत...

मा. महोदय,

मी ........................................................ महाविद्यालय ........................... ........................... अभ्यासक्रम (Course) ............................. वर्ष (Year).............. ...............................................विद्यापीठाच्या भ्रमणध्वनी क्र. .................. ई-मेल आयडी ........................................ विनंती अर्ज करतो/करते की, मला उन्हाळी-२०२० लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षा केंद्र बदलून मिळणेसाठी विनंती अर्ज करतो/करते की, मला उन्हाळी-२०२० लेखी परीक्षेसाठी कोरोना (कोव्हिड-१९) विषाणूंच्या प्रादूर्भावामुळे एक वेळेची विशेष बाब म्हणून विद्यापीठामार्फत उपलब्ध करुन दिलेल्या माझ्या अभ्यासक्रमाच्या विद्याशाखांच्या परीक्षाकेंद्र पर्यायांन्वये खालील शहर/गावापैकी परीक्षाकेंद्र दिल्यास मी आपला/आपली आभारी असेल.

शहर/गांव (केंद्रासाठी) अपेक्षित

१. ....................
२. ....................
३. ....................

} कृपया फक्त शहर/गावाचे नाव नमूद करावे.

माझ्या पालकांचे निवासी शहर/गांव उपरोक्त ३ पर्यायांपैकी असल्याचे प्रमाणित करण्यासाठी सोबत दस्तावेज (आधारकार्ड/रेशनकार्ड/...................................) जोडले आहे.

उपरोक्त दिलेली माहिती खरी असून त्याप्रमाणे विनंती करण्यात येत आहे. तरी कृपया माझ्या अर्जाचा सकारात्मकतेने विचार करावा ही विनंती. प्रशासकीय कारणास्तव माझी विनंती अमान्य होवू शकते किंवा उपरोक्त ३ पैकी कोणत्याही शहर/गावांत परीक्षा केंद्र मिळू शकते याची मला जाणीव आहे. तसेच उक्त ३ पैकी केंद्र न मिळाल्यास माझ्या स्वतःच्या महाविद्यालयात परीक्षा केंद्र असेल याची मला जाणीव आहे.

धन्यवाद.

परीक्षार्थीची स्वाक्षरी

सही व महाविद्यालयाचा शिक्का
अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक

Terna Public Charitable Trust's
Terna Medical College
Nerul, Navi ... 400706
Inward No.
Date
Signature of Receiver

# महाविद्यालयाने सादर करावयाचा विद्यार्थ्यांच्या यादीचा नमूना

महाविद्यालयांचे नांव : ..........................................................................................

अभ्यासक्रम (Course) : ................................ वर्ष (Year) :.........................

| अ.क्र. Sr. No. | विद्यार्थ्यांचे नांव Name of Students | भ्रमणध्वनी क्र. Mobile No. | ई-मेल आयडी E-mail ID |
|---|---|---|---|
| | | | |

सही व शिक्का
अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक

सोबत : उक्त यादीतील सर्व विद्यार्थ्यांचे केंद्र बदलीचे विनंती अर्ज

## विद्याशाखानिहाय ई-मेल आयडी :

| अ. क्र. | पदवी विद्याशाखा | ई-मेल आयडी | अ. क्र. | पदव्यूत्तर विद्याशाखा | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय | ugexammedical@muhs.ac.in | ६ | वैद्यकिय | pgexammedical@muhs.ac.in |
| २ | दंत | ugexamdental@muhs.ac.in | ७ | दंत | pgexamdental@muhs.ac.in |
| ३ | आयुर्वेद/युनानी | ugexamayurved@muhs.ac.in | ८ | तत्सम (नर्सिंग, भौतिकोपचार व व्यवसायोपचार | pgexamallied@muhs.ac.in |
| ४ | होमिओपॅथी | ugexamhom@muhs.ac.in | ९ | आयुर्वेद/युनानी व होमिओपॅथी | pgexamayurved@muhs.ac.in |
| ५ | नर्सिंग<br>भौतिकोपचार/व्यवसायोपचार | ugexamnursing@muhs.ac.in<br>ugexamptot@muhs.ac.in | | | |

---

Following is the tentative list of centres made available to choose the option.

Click Here for MBBS course Theory Examination centres List.
Click Here for BDS course Theory Examination centres List.
Click Here for BAMS course Theory Examination centres List.
Click Here for BUMS course Theory Examination centres List.
Click Here for BHMS course Theory Examination centres List.
Click Here for BPTH course Theory Examination centres List.
Click Here for BOTH course Theory Examination centres List.
Click Here for Basic BSc course Theory Examination centres List.
Click Here for PBBSc course Theory Examination centres List.
Click Here for BASLP course Theory Examination centres List.
Click Here for BPO course Theory Examination centres List.